**महाराष्ट्र शासन**
**वेतनपथक (उच्च शिक्षण)**
**पुणे विभाग, पुणे**
**१७ डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे ४११ ००१**
Web - www.jdhepune.info Email - payunit@jdhepune.info

फोन नं.०२०/२६१२७८३३, २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०/२६०५१६३२

क्रमांक - थकित - २०२०/२०२०-२१/१२/वेतनपथक, पुणे दिनांक - ०४ फेबुवारी, २०२१

प्रति,

प्राचार्य,
सर्व अशासकीय अनुदानित कला, विज्ञान, वाणिज्य, विधी,
शिक्षणशास्त्र आणि शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालये.

कुलसचिव/मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे
गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे

**विषय - सन २०२०-२१ या आर्थिक वर्षातील थकित देयकांची माहिती सादर करणेबाबत.**

**संदर्भ - या कार्यालयाचे समक्रमांक दिनांक ०१ फेब्रुवारी, २०२१ चे पत्र.**

उपरोक्त विषयाबाबत या कार्यालयाच्या संदर्भामध्ये नमूद केलेल्या पत्राचे कृपया अवलोकन करावे. सदरहू पत्रान्वये सन २०२०-२१ या आर्थिक वर्षातील थकित रक्कमांचे प्रस्ताव तयार करुन सदरहू प्रस्ताव ठेवण्यात येऊन या कार्यालयाच्या सूचनेप्रमाणे सादर करण्याबाबत कळविलेले होते.

या अनुषंगाने आता असे कळविण्यात येत आहे की, सन २०२०-२१ या वर्षातील थकित रक्कमांचे प्रस्ताव खाली नमूद केलेल्या ठिकाणी, दिनांकास व वेळेत सादर करण्यात यावेत.

| अ.क्र. | जिल्ह्याचे नांव | दिनांक | ठिकाण व वेळ |
|---|---|---|---|
| १ | पुणे शहर | ०६ फेब्रुवारी, २०२१ | गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे वेळ सकाळी १०.३० वाजल्यापासून |
| २ | पुणे जिल्हा | ०८ फेब्रुवारी, २०२१ | |
| ३ | नाशिक | ०९ फेब्रुवारी, २०२१ | |
| ४ | अहमदनगर | १० फेब्रुवारी, २०२१ | |

तरी या कार्यालयाच्या संदर्भामध्ये नमूद केलेल्या पत्रामध्ये दिलेल्या सूचना विचारात घेऊन सन २०२०-२१ या वर्षाचे थकित रक्कमांचे परिपूण प्रस्ताव वर नमूद केलेल्या ठिकाणी, दिनांकास व वेळेत सादर करावेत.

**सही/-**
(डॉ.मोहन खताळ)
सहसंचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे

**महाराष्ट्र शासन**
**वेतनपथक (उच्च शिक्षण)**
**पुणे विभाग, पुणे**
**१७ डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे ४११ ००१**
Web - www.jdhepune.info Email - payunit@jdhepune.info

फोन नं. ०२०/२६१२७८३३, २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०/२६०५१६३२

क्रमांक- वेतन - २०२०/२०२०-२१/१२/वेतनपथक, पुणे दिनांक - ०४ फेब्रुवारी, २०२१

प्रति,

**प्राचार्य,**

सर्व अशासकीय अनुदानित कला, विज्ञान, वाणिज्य,

विधी, शिक्षणशास्त्र आणि शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालये.

पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा

**कुलसचिव/वित्त व लेखा अधिकारी**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

डेक्कन महाविद्यालय व पदव्यत्तर सस्था, पुणे

**विषय - १. नव्याने नियुक्त झालेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांचा एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये समावेश करणे.**

**२. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या झालेल्या बदल्यांबाबत.**

**३. एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये वेतनामध्ये बदल करण्याबाबत.**

**४. एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये नाव व इतर बाबींमध्ये बदल करणे.**

**१. नव्याने नियुक्त झालेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांचा एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये समावेश करणेबाबत -**

या विभागाच्या अधिपत्याखालील ज्या अशासकीय अनुदानित महाविद्यालये आणि अकृषी व अभिमत विद्यापीठांमध्ये नव्याने कर्मचा-यांच्या नेमणुका करण्यात आलेल्या आहेत व त्यांची वेतननिश्चिती सहसंचालक (उच्च शिक्षण) पुणे विभाग पुणे यांनी करुन त्यास लेखा अधिकारी, उच्च शिक्षण अनुदान, पुणे विभाग, पुणे यांनी मान्यता दिलेली आहे त्यांच्या टेम्प्लेट ४ ला मान्यता देण्याचे काम खाली नमूद केलेल्या ठिकाणी, दिनांकास व वेळेत करण्यात येणार आहे. तरी ज्या महाविद्यालये आणि अकृषी व अभिमत विद्यापीठांमध्ये शासन मान्य पदावर कर्मचा-यांच्या नव्याने नियुक्त्या झालेल्या आहेत फक्त अशाच महाविद्यालये/अकृषी व अभिमत विद्यापीठातील या कामकाजाशी संबंधीत कर्मचा-यांनी त्यांची माहिती टेम्प्लेट ४ मध्ये भरुन या कार्यालयास फॉरवर्ड करावी व अशा

नव्याने नियुक्त झालेल्या कर्मचा-यांच्या नियुक्तीबाबतच्या सर्व कागदपत्रांसह आणि टेम्प्लेट ४ सह **संबंधीत ठिकाणी, दिनांकास व वेळेत उपस्थीत रहावे.**

**२. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या झालेल्या बदल्यांबाबत -**

या कार्यालयाच्या असे निदर्शनास आले आहे की माहे जानेवारी, २०२१ मध्ये ब-याच महाविद्यालयांमधील शासन मान्य पदावर कार्यरत असलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांचा बदल्या झालेल्या आहेत. त्यामुळे अशा सर्व कर्मचा-यांना त्यांच्या बदलीच्या ठिकाणी रुजू होऊन त्याप्रमाणे एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये योग्य ते बदल करुन घेण्याचे काम याच कार्यालयात खाली नमूद केलेल्या ठिकाणी, दिनांकास व वेळेत करण्यात येणार आहेकरण्यात येणार आहे. त्यासाठी खालील विवरणपत्रामध्ये आपल्या महाविद्यालयाची माहिती **payunit@jdhepune.info** या इमेल आयडी वर Microsoft Excel मध्ये Times New Roman या फॉन्टमध्ये पाठवावी. **तसेच बदलीबाबतची सर्व कागदपत्रे पीडीएफ मध्ये इमेल सोबत जोडण्यात यावीत. तसेच संबंधीत कर्मचा-यांना एचटीई सेवार्थ प्रणालीमधून Detach करण्यात यावे. तरी वरील बाब लक्षात घेऊन आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह उपस्थीत रहावे.**

**माहे फेब्रुवारी, २०२१ या महिन्यामध्ये झालेल्या बदलींची माहिती दर्शविणारे विवरणपत्र**

Name of the College - H T E Sevaarth userId - H T E Sevaarth Password -

**अ) आपल्या महाविद्यालयामधून इतर महाविद्यालयांमध्ये बदली झालेल्या कर्मचा-यांच्या माहितीचे विवरणपत्र**

| S. N. | Name of the Employee | Designa tion | H T E Sevaarth Id | Subject (for Teachers Only) | Order No. | Order date | Date of Relieving | Post id |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |

**ब) इतर महाविद्यालयांमधून आपल्या महाविद्यालयामध्ये बदली झालेल्या कर्मचा-यांच्या माहितीचे विवरणपत्र**

| S. N. | Name of the Employee | Designa tion | H T E Sevaarth Id | Subject (for Teachers Only) | Order No. | Order date | Date of Joining | Post id |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |

**३. एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये वेतनामध्ये बदल करण्याबाबत.**

ज्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या कॅस मान्य केल्यामुळे/पदोन्नती झाल्यामुळे अथवा इतर कोणत्याही बाबीमुळे वेतननिश्चिती/सुधारित वेतननिश्चिती झालेली आहे व त्यास लेखा अधिकारी, उच्च शिक्षण अनुदान, पुणे विभाग, पुणे यांनी मान्यता दिलेली आहे यामुळे अथवा इतर कोणत्याही कारणामुळे वेतनामध्ये फरक होत

असल्यास त्या अनुषंगानेची माहिती खालील विवरणपत्रामध्ये खाली नमूद केलेल्या ठिकाणी, दिनांकास व वेळेत उपस्थीत रहावे.

| S. N. | Name of the Employee | Designation | H T E Sevaarth Id | Reason |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |

**४. एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये नाव व इतर बाबींमध्ये बदल करणे -**

ज्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये वेतन/जन्मतारीख/सेवानिवृत्तीची तारीख या बाबींव्यतिरिक्त इतर काही बाबींमध्ये उदा. नावामध्ये/बँक खाते क्रमांकामध्ये इ. बदल करावयाचे असल्यास अशा बदलांना मान्यता देण्याचे कामदेखील खाली नमूद केलेल्या ठिकाणी, दिनांकास व वेळेत करण्यात येणार आहे. तरी या अनुषंगाने या पूर्वी दिलेल्या सूचना विचारात घेऊन योग्य ते बदल एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये करुन ते या कार्यालयास फॉरवर्ड करण्यात यावेत.

वरील बाबी लक्षात घेऊन ज्या महाविद्यालये/अकृषी व अभिमत विद्यापीठांमध्ये वरील बाब १ ते ४ च्या अनुषंगाने काम असल्यास त्यांनी खाली नमूद केलेल्या ठिकाणी, दिनांकास व वेळेत करण्यात येणार आहे.

| अ.क्र. | जिल्ह्याचे नांव | दिनांक | ठिकाण व वेळ |
|---|---|---|---|
| १ | पुणे शहर | ०६ फेब्रुवारी, २०२१ | गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे<br>वेळ सकाळी १०.३० वाजल्यापासून |
| २ | पुणे जिल्हा | ०८ फेब्रुवारी, २०२१ | |
| ३ | नाशिक | ०९ फेब्रुवारी, २०२१ | |
| ४ | अहमदनगर | १० फेब्रुवारी, २०२१ | |

**सही/-**
(डॉ. मोहन खताळ)
सहसंचालक (उच्च शिक्षण),
पुणे विभाग, पुणे